महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / 25536712(OFF) | FAX- 020/25536761<br>E-MAIL - sscboardpune@gmail.com<br>Website- www.sscboardpune.in |

जा.क्र.पुविमं / उमा ओ/2 3372
दिनांक 27/ 04 / 2026.

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

**विषयः-** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) जुन-जुलै २०२६ परीक्षेस शाळाबाहय असलेल्या व खाजगीरित्या प्रविष्ठ (अर्ज क्रं.१७ अन्वये) होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रक्रियेबाबत.

**संदर्भः-** राज्य मंडळ /परीक्षा.३/१७२० दिनांक २१/०४/२०२६ चे पत्र व प्रकटन

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मंडळामार्फत जुन-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस शाळाबाहय असलेल्या व खाजगीरित्या (अर्ज क्रं.१७ अन्वये) प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना ऑनलाईन नावनोंदणी दि. २२/०४/२०२६ ते दि. २१/०५/२०२६ अर्ज सादर करण्याबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर पत्राची नोंद घेवून उचित कार्यवाही करण्यात यावी.

तसेच विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तो आपल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयात सर्व कागदपत्रासह प्राप्त झाल्यास अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईनरित्या या मंडळास पाठविण्यात यावेत. तरी कोणताही विद्यार्थ्याचा खाजगी नावनोंदणी अर्ज नाकारण्यात येवू नये, तसे आढळून आल्यास मंडळ नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सोबत :- संदर्भिय दि. २१/०४/२०२६ चे प्रकटन

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 27-04-2026
10:30:32

(डॉ मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव, (प्र.)
पुणे विभागीय मंडळ, पुणे

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज

### प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी)परीक्षासाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**अनेक शाळाबाह्य विद्यार्थी पात्र असूनही मंडळाने दिलेल्या मुदतीत नावनोंदणी अर्ज भरू न शकल्याने अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून जून-जुलै २०२५ च्या परीक्षांसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्याकरिता नावनोंदणीसाठी संधी देण्यात आली होती.**

त्यानुसार जून-जुलै २०२६ च्या इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी शाळाबाह्य खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी/ शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

तेव्हा जून-जुलै २०२६ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबतची कार्यवाही दिनाक-२२ /०४ /२०२६ पासून सुरु करण्यात येत असून सदरील अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरून भरावयाचे आहेत.

1 जून-जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | बुधवार दि. २२/०४/२०२६ ते गुरुवार दि.२१/०५/२०२६ |

2.खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यासाठी फेब्रु - मार्च २०२६ च्या परीक्षेचेवेळी ज्या अटी व शर्ती निर्धारित केलेल्या होत्या त्याच अटी व शर्ती जून-जुलै २०२६ च्या परीक्षेसाठी कायम राहतील. सदर अर्ज फक्त नियमित शुल्काने घ्यावयाचे असून याकरिता विलंब / अतिविलंब शुल्काची मुदत असणार नाही व मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबधित घटकांनी नोंद घ्यावी.

3.खाजगी विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

4. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी/१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून मंडळाची परीक्षा दयावयाची आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम, शाखा (Stream) व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.

5. नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी .

6.सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

7. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर / मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते upload करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल कमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

8. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

९. खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे

इ.१०वी :- रु.१११०/- नाव नोंदणी शुल्क + रु.१००/- प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

इ.१२वी :- रु.१११०/- नाव नोंदणी शुल्क + रु.१००/- प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

10 इ. १०वी/१२वी जून-जुलै २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

11 अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल. त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यम व शाखेनुसार (Stream), त्यास उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल. त्यामधील एका उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

12. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्र / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

13. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १० वी साठी (१७ नं.) खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करता येईल.

14. ऑनलाईन अर्ज भरतांना अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत Website वर दिलेल्या Helpline वर संपर्क साधावा.

15. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) ऑनलाईन पध्दतीने मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे.

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ पुणे -०४

दिनांक -२१/०४/२०२६